महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १३० वे | दिनांक : ०५/०५/२०२६ | वार मंगळवार

## बंगालच्या विजयावर मोदी म्हणाले- गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत कमळ फुलले



**नवी दिल्ली :** पंतप्रधान मोदी सोमवारी दिल्लीतील भाजप मुख्यालयात म्हणाले, बंगालच्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत आयुष्मान भारतला मंजुरी दिली जाईल. घुसखोरांवर कारवाई केली जाईल.
महिलांना सुरक्षित वातावरण मिळेल, तरुणांना रोजगार मिळेल आणि स्थलांतर थांबेल. पश्चिम बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरीमध्ये सरकार स्थापन झाल्यावर ते म्हणाले, गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत सर्वत्र कमळ उमलले आहे. अनेक वर्षांच्या निष्ठेचे फळ मिळताना कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला दिसतो आहे.

आजचा दिवस ऐतिहासिक आणि अभूतपूर्व आहे. अनेक वर्षांच्या अथक परिश्रमाचे फळ मिळाले असून या विजयाचे संपूर्ण श्रेय पक्षाचे कार्यकर्ते आणि त्यांच्या कुटुंबीयांना जाते.

उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार आणि आता पश्चिम बंगालमध्ये भाजप/एनडीए सत्तेत आहे. म्हणजेच, गंगोत्री ते गंगासागरपर्यंत कमळ फुलले आहे.

बंगालच्या नशिबात एक नवीन अध्याय जोडला गेला आहे; राज्य आता भीतीमुक्त होऊन विकासाच्या दिशेने वाटचाल करेल. वंदे मातरमच्या 150 व्या वर्षी हा विजय अधिकच महत्त्वपूर्ण आहे.

बंगालमधील महिलांना सुरक्षित वातावरण मिळेल, तरुणांना रोजगार मिळेल, स्थलांतर थांबेल. पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत आयुष्मान योजनेला मंजुरी दिली जाईल. आणि घुसखोरांवर कठोरतम कारवाई केली जाईल.

डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचा आत्मा किती शांत असेल. 1951 मध्ये जनसंघाची स्थापना करून त्यांनी प्रत्येक कार्यकर्त्याला हा संदेश दिला की, देशासाठी जगायचे आणि मरायचे आहे. बंगालला भारताचा भाग ठेवण्यासाठी डॉ. मुखर्जींनी एक मोठी लढाई लढली.

हा विजय भारताची लोकशाही, संविधान आणि लोकांच्या विश्वासाचा विजय आहे. भाजपचा मंत्र 'नागरिक देवो भव' आहे आणि पक्ष जनतेची सेवा करण्यासाठी कटिबद्ध आहे.

## पुण्यात महिला असुरक्षित, गृहमंत्र्यांनी कानावर हात ठेवलेत का?: कीर्ती फाटक



**पुणे :** शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भगिनी कीर्ती फाटक यांनी पुणे पोलिस आयुक्त रंजन कुमार शर्मा यांची भेट घेऊन नसरापूर प्रकरणातील आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

यावेळी माध्यमांशी बोलताना कीर्ती फाटक म्हणाल्या, आम्ही शिवसेना ठाकरे गटाच्या महिला म्हणून नाही तर पुण्यातल्या महिला म्हणून स्वतःला असुरक्षित महिला समजत आहोत. कारण आत्ताच नुकतीच जी घटना घडली आहे नसरापूरची त्याच्या संबंधी मी पोलिस कामिशनर साहेबांना भेटायला आले होते. त्यांनी आम्हाला असे आश्वासन दिले आहे की महिला एवढ्या असुरक्षित कशा झाल्या आहेत पुण्यात? पूर्वी असे नव्हते. आता रोज काहीतरी घडत आहे. मोठ्या वयाची बाई असेल किंवा लहान मुलगी असेल सगळ्यांना कुठेही सुरक्षित वाटत नाहीये. कायद्याचे भय राहिले नाही. आधी गुन्हे केलेले असले तरी तो राजरोसपणे बाहेर फिरत आहे. पुन्हा नवीन गुन्हा करायला मोकळा. हे कुठेतरी थांबायला पाहिजे.

पुढे बोलताना कीर्ती फाटक म्हणाल्या, आम्हाला सुरक्षित जगायचे आहे आणि ही जबाबदारी पोलिस कामिशनर साहेबांची आहे. आणि तुम्ही तुमची जबाबदारी पार पाडण्यासाठी काय उपाययोजना करत आहात? हे आत्ता आम्ही त्यांना विचारले. त्यावर त्यांनी आम्हाला सांगितले की दामिनी पथक आहे, सुरक्षा दीदी आहे, ११२ नंबर डायल केला की लगेच मदत मिळते. मी म्हटले की अहो साहेब ती मदत मिळेपर्यंत घटना घडून गेलेली असते. त्याच्यावर ठोस उपाययोजना पाहिजे. तुमच्या कर्मचाऱ्यांमध्ये वाढ व्हायला पाहिजे. सध्या पोलिस स्टेशन वाढले आहेत, पण रस्त्यावर फिरणारी सुरक्षा पथक वाढली पाहिजेत आणि त्यात महिला वाढल्या पाहिजेत, अशी मागणी आम्ही केली आहे.

कीर्ती फाटक म्हणाल्या, सगळीकडे सोशल मीडियाचा प्रभाव वाढला आहे. सध्याच्या विकृती वाढण्यामागे सोशल मीडिया आहे. आपण आपल्या मुलांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. आपल्या मुलांनी कोणापासून सावध राहिले पाहिजे, आपले मुलं सुद्धा कसा वागावा हे आपण घरीच प्रशिक्षण दिले पाहिजे. आपल्या घरात सुद्धा कोणी विकृत वागत नाही न हे देखील आपण पाहिले पाहिजे.

तसेच गृहमंत्री अपयशी ठरले का? असे विचारले असता कीर्ती फाटक म्हणाल्या, गृहमंत्री अपयशी ठरले आहेत हे वाक्यच आता मला बोलावे वाटत नाहीये. म्हणजे मला आता त्यावर बोलावेच वाटत नाही. किती निदर्शने करायची, किती मोर्चे काढायचे, किती आरडाओरडा करायचा, त्याच्यावर कुठे काय होत आहे? कारण गृहमंत्र्यांनी कानावर हात ठेवले असतील, डोळ्यावर हात ठेवले असतील तर आपण बोलून, आपण ओरडून काहीच होणार नाहीये. त्यामुळे मला त्यांना काहीच बोलायचे नाही. आता लोकच बघत आहेत, तेच आता त्यांचे मत ठरवत आहेत.

## पश्चिम बंगालचा विजय सरळ मार्गाने नाही मिळवला : संजय राऊत यांची भाजपवर टीका



**मुंबई :** पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसामच्या निवडणुकांची मतमोजणी सुरू आहे. यात पश्चिम बंगालमध्ये भाजपचा विजय होताना दिसत आहे. तर केरळमध्ये कॉंग्रेसला अधिक मत मिळतंय दिसत आहे. या सगळ्या परिस्थितीवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच पश्चिम बंगालचा विजय हा सरळ मार्गाने मिळवलेला नसल्याची टीका राऊत यांनी केली आहे.
संजय राऊत म्हणाले, लुटालूट सुरू आहे. सीआरपीएफची मदत भाजपच्या कार्यकर्त्यांना होईल. हे जरी असले तरी भारतीय जनता पक्ष पश्चिम बंगालमध्ये सत्ता घेताना दिसत आहे. मोदी आणि शहा यांचे जे स्वप्न होते की पश्चिम बंगालमध्ये निवडणूक जिंकावी त्यांच्या कार्यकिर्दीत. हे त्यांचे सवपान पूर्ण झाले आहे. त्यांचे स्वप्न पूर्ण झाल्यामुळे कदाचित मोदी आणि शहा यांचे राष्ट्रीय स्तरावरचे कार्य संपलेले दिसत आहे.
पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, द्वेष, धर्मांधता, एसआयआर या सगळ्या माध्यमातून ममता बॅनर्जी यांचा विजय रोखणे आणि त्यांचा पराभव करणे हे अशक्य आहे. त्यामुळे आज भारतीय जनता पक्ष जिंकताना दिसत आहे, हा विजय सरळ मार्गाने मिळवलेला नाही, हे आपणही पाहत आहात. केरळमध्ये कॉंग्रेसला प्रचंड यश मिळाले आहे, एक राज्य नव्याने कॉंग्रेसकडे आले आहे. आसाममध्ये भाजप जिंकत आहे, त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. तामिळनाडूमध्ये टीवीके नावच्या पक्षाला लोकांनी मतदान केले आहे. ज्यांना राजकारणाचा आणि समाजकारणाचा कोणताही अनुभव नाही. पण डीएमके आणि एडीएमके या दोघांपेक्षा लोकांनी विजय थलपथीच्या पक्षाला मतदान केले आहे. तिथे कोणालाही बहुमत मिळालेले नाही.

संजय राऊत म्हणाले, दिवा विझताना मोठा होतो. पश्चिम बंगाल, तिथल्या दिव्याची वात जास्त मोठी होती. एनडीएच्या पतनाची ही सुरुवात आहे असे मी मानतो. जिंकले पश्चिम बंगाल, आसाम तरी त्यांना देश चालवणे सोपे नाही. असे काय महान काम केले आहे एनडीएने मागच्या काही वर्षात, कोणी मला सांगितले तर त्याचा मी सत्कार करेल. प्रचंड महागाई वाढलेली आहे. गॅस सिलिंडर मिळत नाहीये, नोकरी नाही मिळते. जगात भारताची मानहानी सुरू आहे. मणिपूर जळत आहे आणि तरी सुद्धा लोक मतदान करत आहेत, असे चित्र निर्माण केले जात असेल तर हा घोटाळा आहे.

भारतीय जनता पक्ष पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींचा कधीच पराभव करू शकत नाही. पण भाजप आणि निवडणूक आयोगाची युती झाली आणि त्या युतीमुळे हा पराभव झाला. आता हे जे निवडणूक आयुक्त आहेत ज्ञानेश कुमार, त्यांना आता काय बक्षीस मिळतंय याची आता आम्हाला प्रतीक्षा आहे, असे संजय राऊत म्हणाले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०५ मे २०२६


## जेईएस महाविद्यालय जालना येथे बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न




**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे)** : जे ई एस महाविद्यालय जालना येथे फेब्रुवारी- २०२६ मध्ये झालेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणवंत विद्यार्थ्यांचा,पालकांसह प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विज्ञान शाखेतील प्रथम विद्यार्थ्यांनी कु. समृद्धी तोष्णीवाल (९०.३३%),द्वितीय- कु. समृद्धी भालेराव (८९.८३%), तृतीय- कु.गौतमी भारवाडा(८९.५%), वाणिज्य शाखेतील प्रथम- अनिकेत रांजणीकर(९४.१७%) व कु. शारवी अग्रवाल (९४.१७%), द्वितीय- कु.वैदेही सोमानी(९३.६७ %)व कु. पूर्वी लोहिया(९३.६७% )आणि ओम हिरप(९२.६७%) ,तृतीय- मयंक झांजरिया (९२.५०%)व कु. प्रियल चोंडीये(९२.५०%) कला शाखेतील प्रथम कु. आरती घुसंगे(७५.३३%), द्वितीय- श्रेयस पट्टे(७४.८३%), तृतीय- कु. प्राची वानरे( ७०.८३%)तसेच एमसीवीसी शाखेतील प्रथम विद्यार्थिनी कु.प्रज्ञा पोळ, द्वितीय- त्रिशा राठी, तृतीय -सोहेल शेख आदी विद्यार्थ्यांचा पालकांसह ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ.सुमंत बिक्कड, पर्यवेक्षक प्रा. ज्ञानेश्वर धनवे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या सत्कार सोहळा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. महेश सोनी यांनी मानलेत. यावेळी महाविद्यालयातील, विद्यार्थी - विद्यार्थिनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साखरे बोरगांव येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**पाटोदा (प्रतिनिधी)** : बीड तालुक्यातील मौजे साखरे बोरगांव येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सायं 4:00वाजता सजवलेल्या रथातुन भगवान गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक काढण्यात आली होती. ढोल ताशाच्या गजरात व दारूच्या अतिषबाजीत ही मिरवणुक संपन्न झाली. त्या नंतर अध्यक्षस्थानी सरपंच श्री. गजानन बप्पा घरत व प्रमुख पाहुणे म्हणुन ग्रामविकास अधिकारी श्री श्रीराम वीर साहेब व प्रा.डॉ.अशोक देवगुडे हे होते. तर व्यासपीठावर माजी सरपंच श्री. बाबासाहेब देवगुडे, श्री. शिवाजीराव माने, श्री. अविनाश जगदाळे, पोलीस पाटील तुकाराम घरत,चेअरमन श्री.राजेंद्र नाना घरत,श्री.कोकाटे साहेब, ग्रा. प. सदस्य श्री. अशोक गाढवे,श्री.दत्ता जाधव,श्री.जगदाळे,बंडू श्री, रमेश जाधव ,श्री. राघुमामा शेंडगे आदि मान्यवरांची उपस्थिती होती. सर्व प्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते भगवान गौतम बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, त्यानंतर सामुहिक अभिवादन व बुध्द वंदना घेण्यात आली. कु.गायकवाड, कु. डोळस आदि युवक युवतीनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रभावी भाषणे केली.प्रमुख पाहुणे श्री. श्रीराम वीर यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य सांगुन सर्वांना शुभेच्छा! दिल्या. प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शैक्षणिक व महिलासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन.मुलांच्या शिक्षणाचा ध्यास घ्यावा व महिलांना सन्मान द्यावा असे अहवान केले. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना सरपंच श्री. गजानन बप्पा घरत यांनी सर्वांना शुभेच्छा! दिल्या हा जंयती सोहळा उत्साहात साजरा करण्यासाठी संघर्ष ग्रुप व जयंती उत्सव समितीचे युवा अध्यक्ष आदित्य डोळस, सदस्य, अनिकेत डोळस ग्रा.सदस्य आनंद डोळस,शहादेव डोळस, मिलिंद डोळस, बाबासाहेब डोळस, बळीराम जाधव, सुरज डोळस, नितीन डोळस आदि युवकांनी अथक परिश्रम घेतले. शांतता व सुरक्षा देण्यासाठी नेकनूर पोलीस स्टेशनच्या पोलीस बांधवानी चोख बंदोबस्त दिला. या जयंती उत्सवाचे संचलन रोहन डोळस यांनी केले तर आभार आनंद डोळस यांनी मानले. या प्रसंगी बहुसंख्य युवक,युवती,महिला भगिणी व गावकरी उपस्थित होते.

## जिंतूर ते औंढा रोडवर लिंबाळा पाटीवर अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : दि ३ जिंतूर ते औंढा रोडवर लिंबाळा पाठीच्या पुला जवळ अज्ञात वाहनाची धडक दिल्यामुळे अशोक सिताराम मांडे वय ४४ रा. ऊखळी ता औंढा नागनाथ जिल्हा हिंगोली येथील रहिवासी आसुन शनिवारी दिवसभर आपल्या मिरचीचा व्यापार करून २ मे रोजी शनिवार रात्री उशिरा दहा-साडेदहाच्या दरम्यान आपल्या उखळी गावाकडे जात असताना जिंतूर पासून पंधरा किलोमीटर अंतरावर लिंबाळा पाटी च्या पुलात जवळअज्ञात वाहनाच्या धडक दिल्यामुळे दुचाकी वर असलेला युवक अशोक मांडे हा तरुण अज्ञात वाहनाच्या धडकेने मृत्यू पावला आहे.या घटनेची जिंतूर पोलीस महामार्ग कॉन्स्टेबल वाल्मीक चव्हाण यांना माहिती मिळतात त्यांनी रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळाकडे धाव घेतली व त्या युवकास जिंतूर ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले रुग्णवायची चे ड्रायव्हर विजय आडे व वाल्मीक चव्हाण या दोघांनी या युवकास जिंतूर ग्रामीण रुग्णालयात नेउन व तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच मांडे परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे .या घटनेमुळे उखळी गावावर दु:खाचा डोंगर कोसळला असून सदर घटना शनिवारी रात्री अकराचे दरम्यान घडली . त्यावेळेस त्या युवकाजवळ एक बॅग होती. त्या बॅगमध्ये दिवसभर व्यापार केलेलेमिरचीचे व्यापार केलेले. अंदाजे ७० हजार रुपये होते. ते पैसे पोलीस कर्मचाऱ्यांच्या स्वाधीन रुग्णवाहिकेचे ड्रायव्हर विजय आडे यांनी केले आहे. या घटनेची जिंतूर पोलिसांना माहिती मिळताच जिंतूर पोलीस ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे रात्री दाखल झाले होते. हे वृत्तलेपर्यंत जिंतूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद झालेला नव्हता.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०५ मे २०२६


## प्रतिभा निकेतन माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील मुरूम येथिल प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज दि.4 चार बार सोमवार रोजी १२ वीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा नुकताच अतिशय उत्साहात पार पडला..शाळेच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले यावर्षीच्या 12 बोर्ड परीक्षेत गुणानुक्रमे कला वाणिज्य व विज्ञान शाखेतून प्रथम द्वितीय तृतीय येणाऱ्या सत्कार करण्यात आला.याप्रसंगी बोलताना विद्यालयाचे प्राचार्य म्हणाले,"विद्यार्थ्यांचे हे यश केवळ गुणांचे नाही, तर त्यांच्या जिद्द आणि कष्टाचे फळ आहे." तसेच, शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाचा आणि पालकांच्या सहकार्याचा उल्लेखही त्यांनी आवर्जून केला सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांपैकी १२ वीतील यशस्वी विद्यार्थी प्रतीक्षा गावडे आपल्या भावना व्यक्त करताना या यशाचे श्रेय शिक्षकांना दिले.त्यांना अश्रूचा अनावर झाला कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप प्राचार्य उमाकांत महामुनी सूत्रसंचालन सतीश रामपुरे व आभार अजित सूर्यवंशी यांनी मानले.कार्यक्रमाच्या शेवटी, उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि कार्यक्रम संपन्न झाला.

## 'पीएसआय' देवूळवाडी कविचे गाव म्हणून ओळख आसणारे आता पीएसआयचे गाव म्हणून नवी ओळख



**अतनुर (प्रा. सुधीर पंचगल्ले,) :** कठोर परिश्रम, जिद्द आणि नोकरी सोबत केलेल्या सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर उदगीर तालुक्यातील देवूळवाडी येथील चार तरुणांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक (PSI) मर्यादित विभागीय परीक्षेच्या अंतीम निकाल जाहीर झाला. या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर देवळवाडी येथिल ४ तरुणांनी पोलीस उपनिरिक्षक पदावर झेप घेत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामुळे संपूर्ण परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. उदगीर तालुक्यातील आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या या देवूळवाडी गावातील पोलीस दलातकार्यरत असणाऱ्या ४ तरुणांची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाली आहे. एकाचवेळी एकाच गावातून ४ जणांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती झाल्याची ही घटना परिसरातच नव्हे तर महाराष्ट्रातही पहिल्यांदाच घडल्याचे मानले जात आहे. महाराष्ट्र पोलीस खात्या अंतर्गत झालेल्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला असून या निकालात उदगीर तालुक्यातील देवूळवाडी येथील विविध ठिकाणी पोलीस दलात कार्यरत असलेल्या चार पोलीस हवालदारांनी गावात आनंदाचे वातावरण या चौघांच्या घवघवीत यशामुळे देवूळवाडी गावात आनंदाचे वातावरण असून ग्रामस्थांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील तरुणांसाठी हे यश प्रेरणादायी ठरत असून मेहनत केली तर यश निश्चित मिळते. हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दिला आहे. त्यामुळे देवूळवाडी पुन्हा एकदा प्रेरणास्थान ठरले असून छोट्या गावातून मोठा इतिहास घडविता येतो, हे या चार तरुणांनी सिद्ध केले आहे. यश मिळवले आहे. त्यामुळे गावात आनंदाचे वातावरण आहे. या गावातील प्रल्हाद अण्णाराव केंद्रे (बाबुले) यांची सन २०१५ मध्ये अमरावती पोलीस दलात निवड झाली. ते सध्या अमरावती शहर पोलीस दलात पोलीस हवालदार यापदावर कार्यरत असून पोलीस दलात सेवा करत असतानाच त्यांनी उराशी बाळगलेले पीएसआय पदाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अहोरात्र अभ्यास केला. या जिद्दीच्या जोरावर त्यांनी अखेर पोलीस उपनिरीक्षक पद गाठले आहे. त्यानंतर या गावातील पोलीस दलात कार्यरत असलेले ज्ञानेश्वर नामदेव केदार यांची २०१४ मध्ये यवतमाळ पोलीस दलात पोलीस म्हणून निवड झाली होती. ते सध्या पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत आहेत. कर्तव्य निभावत त्यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांचे फळ म्हणून पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड मिळवली आहे. तिसरे पोलीस दत्ता हनुमंत केंद्रे उर्फ पाटील हे सन २०१६ पासून अमरावती येथे राज्य राखीव पोलीस बल (एसआरपीएफ) मध्ये कार्यरत असून प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत त्यांनी पोलीस उपनिरीक्षक पदाचे यश संपादन केले आहे.

या गावातील चौथे पोलीस नामदेव गोपीनाथ कोळगीर यांची २०१६ मध्ये नागपूर शहर पोलीस दलात निवड झाली. ते सध्या नागपूर पोलीस दलात कार्यरत असून त्यांच्या चिकाटी आणि जिद्दीमुळे त्यांनीही पोलीस उपनिरीक्षक पदावर आपली छाप उमटवली आहे.

## मार्ग अहिंसेचा

तथागताचा अहिंसा केवळ शब्द नाही,
तो जीवनाचा सुंदर श्वास आहे।
रागाच्या ज्वाला विझवणारा,
तो शांततेचा सुवास आहे।
जगात वाढतो द्वेष जेथे ,
अंधार दाटून येतो तेथे।
अहिंसेचा दिवा लावला की,
प्रेमाचा प्रकाश पसरतो।
शस्त्राने जिंकता येते रण,
पण मन जिंकता येत नाही।
अहिंसेच्या कोमल स्पर्शाने,
जग जिंकणे कठीण नाही।
दया, करुणा, प्रेम जपू,
हिंसेपासून दूर राहू।
हातात हात घालून सारे,
शांतीचा नवा मार्ग घडवू सारे।
अहिंसा हीच खरी ताकद,
तीच मानवतेची ओळख आहे।
जग बदलायचे असेल जर,
अहिंसा हाच योग्य मार्ग आहे।



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## सेल्फीची दुनिया

चल चल गं सखे
खाऊ या कुल्फी
आपणच आपली
काढू या सेल्फी. 1

सेल्फीची दुनिया
आहे किमयागार
स्वत:मध्ये गुंतून
झालो गप्पगार. 2

काढण्यास फोटो
लागत नाही वेळ
काढतोय फोटो
वाजवूनी टाळ. 3

सेल्फीच्या दुनियेत
माणूस झाला सुंदर
वास्तवात पाहता
दिसतो बिलंदर. 4

सेल्फीच्या दुनियेत
लोक झाले वेडे
सेल्फीच्या दुनियेने
नादी लावले खेडे. 5

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## पिंकीचा खेळ

पिंकीला आणला
नवा नवा खेळ
खेळण्यात रमायची
कितीतरी वेळ

पोळपाटावर लाटायची
पोळी छान छान
मम्मीला म्हणायची
वाढू का तुझे पान

मिक्सरमध्ये शेंगदाणे
बारीक करे कशीबशी
सर्वांना म्हणायची
आज मला एकादशी

खेळतांना मैत्रीणींना
वाटायची खाऊ
हात धरून म्हणायची
घरी नका जाऊ!

उंच होऊन काढे
कपाटातील फणी
विंचरून विंचरून
बाहुलीची घाले वेणी

दिवसभर चाले
पिंकीचा असा खेळ
मम्मीला मिळायचा
घरकामात वेळ



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६



प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०५ मे २०२६

# राजर्षी शाहू महाराजांचे परिवर्तनवादी कार्य



भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर ते पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच महान, दूरदर्शी आणि समाजपरिवर्तनाला आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. 6 मे हा त्यांचा स्मृतिदिन केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून, तो सामाजिक समतेच्या, न्यायाच्या आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून समाजातील विषमता, अन्याय आणि जातीय भेदभाव यांना ज्या पद्धतीने आव्हान दिले, ते भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी पर्व ठरले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित, दलित, मागासवर्गीय आणि स्त्रिया यांना केवळ संधीच मिळाली नाही, तर सन्मानाने जगण्याचा अधिकारही प्राप्त झाला. म्हणूनच शाहू महाराजांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक नोंद नाही, तर ते आजच्या आधुनिक भारताच्या सामाजिक रचनेचा एक भक्कम पाया आहे.राजर्षी शाहू महाराजांचा जन्म 26 जून 1874 रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव घाटगे असे होते. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक जाणिवांचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील विषमता आणि अन्याय जवळून अनुभवला होता. पुढे कोल्हापूर संस्थानाच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केवळ प्रशासनासाठी न करता, समाजपरिवर्तनासाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार म्हणजे केवळ सत्ता नव्हती, तर ती एक सामाजिक जबाबदारी होती.शाहू महाराजांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. त्या काळात शिक्षण ही केवळ उच्चवर्गीयांची मक्तेदारी होती. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारली, शिष्यवृत्ती दिल्या आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणामुळेच व्यक्ती सक्षम होते आणि समाज बदलतो, या विश्वासातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.शाहू महाराजांच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे त्यांनी कोल्हापूर संस्थानात 1902 साली लागू केलेले आरक्षण धोरण होय. त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी 50 टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला मोठे आव्हान देणारा होता. आरक्षणाच्या माध्यमातून त्यांनी वंचित घटकांना सत्तेच्या आणि प्रशासनाच्या केंद्रस्थानी स्थान मिळवून दिले. हा निर्णय केवळ धोरणात्मक नव्हता, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष अंमल होता.जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी मोठी अडचण असल्याचे शाहू महाराजांना जाणवले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि मंदिरे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील भेदभाव कमी होण्यास मदत झाली आणि सामाजिक एकात्मतेची भावना वाढीस लागली.स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले, विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली आणि स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या मते, समाजाचा विकास हा स्त्रियांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला.आर्थिक क्षेत्रातही शाहू महाराजांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणे राबवली, सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जसवलती, सिंचन सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती सुधारली.शाहू महाराजांच्या कार्यात धर्मनिरपेक्षतेचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता हीच सर्वोच्च मूल्य होती. त्यांनी कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या आधारावर भेदभाव केला नाही.त्यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक समाजसुधारकांवर पडला आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी अप्रत्यक्ष प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित घटकांना आत्मविश्वास मिळाला आणि त्यांनी प्रगतीचा मार्ग धरला.आजच्या काळात शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. अजूनही समाजात विषमता, भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक न्यायासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते.राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाची व्यापकता आणि दूरदृष्टी लक्षात घेतली पाहिजे. त्यांनी समाजातील असमानतेकडे केवळ दयाभावाने पाहिले नाही, तर ती एक संरचनात्मक समस्या आहे, जी राज्यव्यवस्थेच्या सक्रिय हस्तक्षेपाशिवाय दूर होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे ओळखले. म्हणूनच त्यांनी आपल्या कारभारात केवळ सुधारणा न करता, एक प्रकारे सामाजिक क्रांतीच घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळणे हेच खरे लोकशाहीचे तत्त्व होते.शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर सामाजिक प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केवळ आरक्षण लागू केले नाही, तर त्याची काटेकोर अंमलबजावणीही केली. त्यांनी मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये स्थान देताना त्यांच्या प्रशिक्षणाची, कौशल्यविकासाची आणि आत्मविश्वास वाढवण्याचीही काळजी घेतली. त्यांच्या मते, संधी देणे हे पहिले पाऊल आहे, परंतु त्या संधीचा उपयोग करण्यासाठी आवश्यक साधने आणि वातावरण उपलब्ध करून देणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे, त्यांनी समाजातील उच्चवर्गीयांच्या वर्चस्वाला थेट आव्हान दिले. त्या काळात ब्राह्मणवर्गाचे प्रशासन, शिक्षण आणि धार्मिक क्षेत्रांवर मोठे वर्चस्व होते. शाहू महाराजांनी या वर्चस्ववादी रचनेला धक्का देण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा दिला. त्यांनी समाजातील इतर घटकांना सशक्त करून एक समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे समाजात एक नवीन सामाजिक जागृती निर्माण झाली.शाहू महाराजांचे कार्य केवळ सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी लोककलांना प्रोत्साहन दिले, कलाकारांना संरक्षण दिले आणि समाजातील सांस्कृतिक विविधतेचा सन्मान केला. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीला वाव दिला, ज्यामुळे समाजात आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली.शाहू महाराजांनी पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांचा उपयोगही समाजजागृतीसाठी केला. त्यांनी विविध वृत्तपत्रांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक प्रश्नांवर खुल्या चर्चेला चालना दिली. त्यांच्या मते, समाजातील बदलासाठी विचारांची देवाणघेवाण आणि संवाद अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पाठिंबा दिला.धर्माच्या बाबतीतही शाहू महाराजांची भूमिका अत्यंत प्रगत होती. त्यांनी धर्माला वैयक्तिक श्रद्धेचा विषय मानले आणि राज्यकारभारात धर्मनिरपेक्षतेचा अवलंब केला. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील ऐक्य आणि बंधुता टिकवण्यासाठी धर्मनिरपेक्षता अत्यंत आवश्यक होती.शाहू महाराजांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्याला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी केवळ धोरणे राबवली नाहीत, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना समतेचे, बंधुत्वाचे आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून आला.आजच्या काळात शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना आपण त्यांच्या धोरणांचा आणि विचारांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करणे आवश्यक आहे. आज भारतात शिक्षण, आरक्षण, सामाजिक न्याय आणि स्त्रीसक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये अनेक प्रगती झाली आहे, परंतु अजूनही अनेक आव्हाने अस्तित्वात आहेत. समाजातील काही घटक अजूनही शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित आहेत.आरक्षण धोरणांवर आजही मोठ्या प्रमाणावर चर्चा आणि वादविवाद होत आहेत. काहीजण आरक्षणाला विरोध करतात, तर काहीजण त्याचे समर्थन करतात. या वादांच्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी आरक्षणाला एक तात्पुरती पण आवश्यक उपाययोजना मानली होती, जी समाजातील विषमता दूर करण्यासाठी आवश्यक आहे.आजच्या काळात 'मेरिट' या संकल्पनेवरही मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. काहीजण असा युक्तिवाद करतात की, आरक्षणामुळे गुणवत्ता कमी होते. परंतु शाहू महाराजांनी स्पष्टपणे दाखवून दिले की, गुणवत्ता ही केवळ जन्मावर अवलंबून नसून, ती संधी आणि संसाधनांवर अवलंबून असते. जेव्हा समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळतील, तेव्हाच खरी गुणवत्ता विकसित होऊ शकते. शाहू महाराजांच्या कार्यातून आपल्याला हे शिकायला मिळते की, समाजातील परिवर्तनासाठी केवळ कायदे आणि धोरणे पुरेशी नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते. त्यांनी आपल्या कार्यातून समाजात जागृती निर्माण केली आणि समतेच्या मूल्यांचा प्रसार केला.आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक न्यायाचे स्वरूप बदलत आहे. नवीन प्रकारच्या विषमता निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला समतेचा आणि न्यायाचा संदेश आजही तितकाच लागू आहे. राजर्षी शाहू महाराजांचा स्मृतिदिन हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस असला, तरी तो आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवसही आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा सखोल अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते की, त्यांनी ज्या प्रकारे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांना आपल्या कारभाराच्या केंद्रस्थानी ठेवले, ते आजच्या आधुनिक लोकशाही व्यवस्थेसाठीही अत्यंत मार्गदर्शक आहे. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य केवळ एका संस्थानापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेवर पडला. त्यांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी जे उपाययोजना केल्या, त्या आजही सामाजिक धोरणांच्या मुळाशी आढळतात.आजच्या भारतात संविधानिक पातळीवर समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये मान्य केली गेली आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची व्यवस्था केली गेली आहे. स्त्रियांसाठी विविध सक्षमीकरणाच्या योजना राबवल्या जात आहेत. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या सर्व प्रक्रियांमध्ये शाहू महाराजांच्या विचारांची छाप स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी मांडलेली 'समान संधी' ही संकल्पना आजच्या धोरणांचा पाया बनली आहे.तथापि, आजच्या काळात सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीत अनेक आव्हानेही आहेत. आरक्षण धोरणांवर राजकीय हस्तक्षेप वाढला आहे, काही ठिकाणी त्याचा गैरवापरही होत असल्याची टीका केली जाते. 'क्रीमी लेयर', आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, खाजगी क्षेत्रातील आरक्षण यांसारखे अनेक नवीन प्रश्न उद्भवले आहेत. या सर्व प्रश्नांचा विचार करताना शाहू महाराजांच्या मूलभूत तत्त्वांची आठवण ठेवणे आवश्यक आहे. आरक्षण ही केवळ सवलत नसून, ती ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करण्याची प्रक्रिया आहे.आजच्या समाजात 'मेरिट' या संकल्पनेभोवतीही मोठा वाद आहे. काहीजण आरक्षणाला गुणवत्ता कमी करणारे मानतात, तर काहीजण ते सामाजिक समतेसाठी आवश्यक मानतात. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, संधी मिळाल्याशिवाय कोणतीही गुणवत्ता विकसित होऊ शकत नाही. त्यामुळे आरक्षण आणि मेरिट हे परस्परविरोधी नसून, आरक्षणामुळेच खऱ्या अर्थाने गुणवत्ता विकसित होऊ शकते.जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक आणि सामाजिक विषमता नव्या स्वरूपात पुढे येत आहेत. तंत्रज्ञानामुळे काही नवीन संधी निर्माण झाल्या असल्या, तरी डिजिटल दरी, शैक्षणिक असमानता आणि रोजगाराच्या संधींमधील विषमता यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. त्यांनी दिलेला समतेचा संदेश आजच्या बदलत्या काळातही मार्गदर्शक आहे.शाहू महाराजांनी समाजपरिवर्तनासाठी केवळ धोरणात्मक बदल केले नाहीत, तर त्यांनी समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांमध्ये समतेची, बंधुत्वाची आणि सहिष्णुतेची भावना निर्माण केली. आजच्या काळातही सामाजिक न्यायाची खरी अंमलबजावणी करण्यासाठी समाजातील मानसिकतेत बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी प्रशासनाला लोकाभिमुख बनवले. त्यांनी सत्तेचा वापर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केला. आजच्या काळातही प्रशासन अधिक संवेदनशील, पारदर्शक आणि लोककेंद्रित बनवण्याची गरज आहे. या संदर्भात शाहू महाराजांचे कार्य प्रेरणादायी ठरते.राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त आपण केवळ त्यांना श्रद्धांजली अर्पण करून थांबू नये, तर त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजातील विषमता, अन्याय आणि भेदभाव दूर करण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. सामाजिक न्याय ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.आजच्या भारतात समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त समाज निर्माण करण्यासाठी शाहू महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत. शिक्षण, आरक्षण, स्त्रीसक्षमीकरण, आर्थिक विकास आणि सामाजिक ऐक्य या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास समाज अधिक प्रगत आणि समतावादी बनू शकतो. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, हीच खरी लोकशाही आहे. शाहू महाराजांनी आपल्या कार्यातून हीच संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक परिवर्तनासाठी धाडस, दूरदृष्टी आणि प्रामाणिकपणा आवश्यक असतो. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपणही समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.शेवटी, राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य हे भारतीय समाजाच्या इतिहासातील एक उज्ज्वल पर्व आहे. त्यांनी समतेचा दीप प्रज्वलित केला, सामाजिक न्यायाचा मार्ग दाखवला आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प करूया. त्यांच्या आदर्शांचा अवलंब करून आपण एक समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त भारत निर्माण करू शकतो हीच त्यांना खरी आणि अर्थपूर्ण श्रद्धांजली ठरेल.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra५@gmail.com

# शोषणमुक्त - कामगार



**आ**जच्या औद्योगिक प्रगतीच्या व भरभराटीच्या काळात या व्यवस्थेतील कामगारांचे स्थान महत्वाचे आहे, हे नावावरुन चालणार नाही. आजच्या कामगार संगणकावर चालणाऱ्या लहान-मोठ्या यंत्रांनी काम करतो आहे. तर काही ठिकाणी तो यंत्रमानवाकडून काम करुन घेतो आहे. ही कामे करत असतांना 1 मि.मी.चा 10000 चा भाग एवढी सुक्ष्मतः तो नियंत्रित करतो आहे. तो खऱ्या अर्थाने औद्योगिक प्रगतीचा कणा आहे. आजचा कामगार त्या त्या उद्योगातील विविध विकास कामांत हिरिरीने भाग घेत आहे. गुणवत्ता नियंत्रण मंडळ, ५-S औद्योगिक सुरक्षितता मंडळ, स्वच्छ भारत अभियान, कामगारांना या विविध उपक्रमांचे महत्व आता पटले आहे. काही उपक्रम उद्योगाच्या प्रत्यक्ष फायद्याचे नसले तरी त्या उपक्रमांचा फायदा त्या उद्योगाला अप्रत्यक्षपणे होतो, हे नक्की.यातून कामगारांची उद्योगावरील निष्ठा वाढेल व उद्योगाच्या भरभराटीत आपले हित आहे, हे त्यांना कळू लागले आहे. उद्योग बंद करणारा, अनाठायी संप पुकारणारा कामगार आता राहिला नाही. काही स्वार्थी राजकारणी मंडळी चुकीच्या पध्दतीने कामगारांना राजकारणात सामील करुन घेतात. तसे पाहिले तर उद्योगात राजकारणाचा लवलेश असता कामा नये, उद्योग बंद वा आजारी पडल्यास, विकास कसा होणार? हे आता कामगारांना कळू लागले आहे.संप, काम बंद आंदोलन, हा चांगला मार्ग नाही, स्पर्धेच्या युगात नित्य नव्या कल्पना घेऊन निरनिराळे उद्योग पुढे येत आहेत व या स्पर्धेत उद्योगांना टिकवून ठेवण्याच्या कामात आजचा कामगार आघाडीवर आहे. आज कामगारांना त्यांच्या कामाच्या जागी फार चांगली सुरक्षितता मिळत आहे. त्याचबरोबर कामगारांना वेळोवेळी विधि विषयावर प्रशिक्षण व मार्गदर्शनपर शिबिरे व्यवस्थापनाकडून आयोजित केली जातात. व्यवस्थापनाकडून कामगारांची आरोग्य तपासणी केली जाते. सुसूत्रता, वेळेचे नियमन, शिस्तबध्दता, त्याचबरोबर कामाप्रती असलेली निष्ठा हे सर्व घटक अप्रत्यक्षरित्या उत्पादन वाढीस, त्याचबरोबर सातत्यपूर्ण उत्पादनास पुरक ठरतात. व्यवस्थापन कामगारांकडून वेळोवेळी सूचना मागवते वज्या सूचनांमुळे उत्पादनात वाढ झाली किंवा सुसूत्रता आली, तर त्या सूचनांना व्यवस्थापन भरघोस असे बक्षिससुध्दा देते. त्यामुळे आजचा कामगार खऱ्या अर्थाने औद्योगिक विकासाचा मुख्य घटक होतमांना दिसत आहे.शासकीय सेवेतील कामगार, खाजगी क्षेत्रातील कामगार, हंगामी कामगार, रोजंदारी कामगार, कंत्राटी कामगार, अशा अनेक प्रकारे कामगारांची वर्गवारी दिसून येते, असे असले तरी मुळ कामगार या घटकाचे सामाजिक प्रश्न सारखेच असतात. त्यांची सोडवणूक व्हायला वही, त्याचबरोबर यांत्रिकीकरण, जागतिकीकरणाच्या नावाखाली कुटीरोद्योग, हस्तकला उद्योग दुर्लक्षित होत आहेत. त्याचबरोबर त्यांच्या कलाकृतींनासुध्दा पाहिजे तेवढे प्रोत्साहन मिळालेच पाहिजे. कारण, हे कारागिर त्या कलाकृती जिवंत करुन समोर आणत असतात, हे विशेष कामगार आहेत.खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरणाच्या धोरणात त्यांच्यासाठी सुध्दा काहीतरी लाभदायक धोरण हवे, भारतातील उद्योग जगतात एकक चांगला बदल घडवून आणण्याचे काम हा सुजाण कामगार करत आहे, कर्तव्य पार पाडल्यानंतर हक्क व मागण्या पूर्ण होतीलच, याचे त्यांना भान आहे.कोणत्याही उद्योगात कामगारांचे शोषण होता कामा नये, श्रमाचा रास्त मोबदला म्हणजे योग्य वेतन मिळालेच पाहिजे. परंतू, हा मोबदला मिळावा, यासाठी तो पूर्वीप्रमाणे पक्षीय संघटनेचा सहारा आजचा कामगार घेत नाही. कारण, या पक्षीय संघटनांनी कामगार वर्गाचे फार मोठे नुकसान केले आहे व कमालीचे शोषण केले आहे. परंतू, आता कामगार वर्गाने कात टाकली आहे. नवनिर्मितीचे वारे याही वर्गात वाहू लागले आहेत. जिज्ञासू, धडाडीचे कामगार स्वतः उद्योग सुय करुन मालक होत आहेत. असे अनेक उद्योजक उद्योगात विक्रमी प्रगती करत आहेत. त्याच बरोबर श्रमाला न्याय देत आहेत, त्याद्वारे श्रमिकांचे होणारे शोषण काही प्रमाणात कम होईल, अशी आशा वाटते.कामगारांना कामाच्या ठिकाणी उच्च दर्जाच्या किंवा आवश्यक त्या सर्व प्रकारच्या सुरक्षाविषयक सुविधा मिळाल्या पाहिजे. दुर्देवाने याकडे फार गांभिर्याने पाहिले जात नाही. त्यामुळे काही वेळा कामगारांच्या जिवावर बेतते. नवभ घडवतांना शासनाने व उद्योजकांनी सुरक्षा सेप्टीयुक्त विकास हे घोषव अंगिकारावे.

**शरदकुमार सिरस**
लेखक, महाराष्ट्र शासनाचा गुणवंत
कामगार पुरस्कार प्राप्त
छत्रपती संभाजीनगर
मो.9890431821
संकलन : बि. डी. रामपूरकर
पत्रकार, जिंतूर

